| **338** | गोरा गोमटा कपाळ करंटा | नुसते दिखाऊपण काही कामाचे नसते |
| **339** | काम न धंदा, हरी गोविंदा | रिकामटेकडा मनुष्य फक्त बडबड करण्यात आपला वेळ घालवतो. |
| **340** | कोल्हयाला द्राक्षे आंबटच | न मिळणारी गोष्ट आवडत नाही असे दर्शवीणे |
| **341** | गाढवाला गुळाची चव काय | मूर्ख माणसाला चांगल्या गोष्टींची किंमत नसते |
| **342** | ओठी तेच पोटी | बोलावे तसे वागावे, सरळमार्गी माणूस |
| **343** | उसाबरोबर एरंडाला पाणी | एखाद्या गोष्टीचा लाभ अनपेक्षितरीत्या दुसऱ्या जवळच्या गोष्टीला होतो |
| **344** | ज्याचा हात मोडेल त्याच्या गळ्यात पडेल | वाईट कृत्य स्वतःलाच भोगावे लागते |

| | | |
|---|---|---|
| 345 | गाढवं मेलं ओझ्याने अन शिगरू मेलं हेलपाट्याने | समजदार व्यक्ती काम करत आपले जीवन व्यतित करतात तर मुर्ख मनुष्य काम न समजल्याने त्रस्त जगतो. |
| 346 | चोरावर मोर | प्रत्येक वाईट माणसाला कधीतरी दुसरा वरचढ माणूस मिळतोच. |
| 347 | उडत्या पक्षाची पिसे मोजणे | सहज चालता बोलता एखाद्या गोष्टीची पारख करणे |
| 348 | करीन ती पूर्व | अंगी असे कर्तुत्व असावे की जे ठरविले ते घडून आलेच पाहिजे |
| 349 | जखमेवर मीठ चोळणे | आधीच त्रस्त असताना परत त्याच गोष्टीविषयी त्रास देणे |
| 350 | श्वानाचीया भुंकण्याला हती देईना किंमत | बलवान व्यक्ती दुर्बल माणसाला किंमत देत नाही |
| 351 | दाणा दाणा टिपतो पक्षी पोट भरतो | कष्टकरी आपले पोट अत्यंत जिकिरीने भरतो |
| 352 | ध चा मा करणे | सांगताना एखाद्या मूळ गोष्टीत बदल करून आपला स्वार्थ साधणे |
| 353 | ताक फुंकून पिणे | प्रत्येक छोटी गोष्ट सुद्धा काळजीपूर्वक करणे |
| 354 | देह देवळात चित्त पायतणात | एका ठिकाणी मन एकाग्र न करता ,दुसऱ्याच ठिकाणीचित्त घोटाळणे. |
| 355 | तू राणी मी राणी पाणी कोण आणी | दोन सुकुमार ,नाजूक व्यक्ती कधीही काम करत नाही, असे व्यक्ती जवळ आल्यास एकमेकांचा एकमेकांना फटका बसतो |
| 356 | नकर्त्यांचा वार शनिवार | काम न करणारा व्यक्ती फक्त बहाणे सांगतो |
| 357 | दिव्या खाली अंधार | मोठ्या व्यक्तीचे सुद्धा गुण दोष असतात |
| 358 | दुधाची तहान ताकावर | छोट्या गोष्टीत समाधानी राहणे |
| 359 | दिवस मेला इथं तिथं अन रात्र झाली निजु कुठं | दिवसभर आपला वेळ वाया घालवून शेवटच्या क्षणास धावा-धाव करणे. |
| 360 | बळी तो कान पिळी | बलवान माणूस दुर्बळ माणसांना पिडतो |
| 361 | नाचता येईना आंगण वाकडे | स्वतः येत नसलेली गोष्ट न करता इतर गोष्टीस बोल लावणे |
| 362 | यज्ञास बळी बोकडाचा | दुर्बळ व्यक्तीला कठीण काम करण्यास सांगणे |
| 363 | सुंठेवाचून खोकला गेला | परस्पर संकट टळले |
| 364 | मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही | काही गोष्टी स्वतःअनुभावल्याशिवाय कळत नाही |
| 365 | शेखी मीरविणे | उगाचच मोठ्या गोष्टी करणे |
| 366 | बोलण्यापेक्ष मौन श्रेष्ठ | अधिक बोलण्या पेक्षा काम करणे चांगले असते |
| 367 | समुद्रामाजी फुटकें तारू | चांगल्या गोष्टींबरोबर वाईट गोष्टी पण असतात |
| 368 | लंकेत सोन्याच्या विटा | दुसऱ्याची श्रीमंती आपल्या काही कामाची नसते |
| 369 | नाकापेक्षा मोती जड होणे | डोईजड होणे |
| 370 | नाकाचा बाल | अत्यंत प्रिय व्यक्ती |
| 371 | पी हळद आणि हो गोरी | उतावीळ होणे |
| 372 | बडा घर पोकळ वासा | #श्रीमंत असून कंजूष असणे, #श्रीमंत असण्याचा आव आणणे |
| 373 | निर्लज्जम सदा सुखी | वाईट व्यक्तीला त्याचा वागण्याचे काहीही वाटत नाही |
| 374 | पाण्यात राहून माशाशी वेर | बलवानाशी शत्रुत्व काय कामाचे ? |
| 375 | मुलाचे पाय पाळण्यात दिसतात | व्यक्तीचे गुणदोष सुरवातीच्या काळात लगेच कळतात |
| 376 | प्रत्येक कुत्र्याचा दिवस असतो | प्रत्येकाचा दिवस येतो |

| | | |
|---|---|---|
| 377 | हलवायाच्या घरावर तुळशीपत्र | स्वतःच्या व्यवसायात नामांकित असूनही आपल्या घरासाठी आपल्या व्यवसायासंबधित सुविधा देता न येणे |
| 378 | बैल गेला अन झोपा केला | एखादी गोष्टीचे महत्व संपल्या नंतर त्यासाठी उपाय योजना करणे व्यर्थ आहे |
| 379 | हात दाखवून अवलक्षण | उगाचच विविध गोष्टी मागे धावून हसे करुन घेणे |
| 380 | दोघींचा दादला उपाशी | एकाच वेळी दोन गोष्टींवर लक्ष केंद्रित केल्यामुळे कोणताही अपेक्षित लाभ न होणे. |
| 381 | रात्र थोडी सोंगे फार | काम भरपूर, वेळ कमी |
| 382 | वाड्याचे तेल वाग्यांवर | एका गोष्टीचा राग दुसऱ्यावर काढणे |
| 383 | वाळूचे कणही रगडीता तेलही गळे | कठोर परिश्रमामुळे कोणतीही गोष्ट साध्या होऊ शकते |
| 384 | दुखणे हत्तीच्या पायाने येते आणि मुंगीच्या पायाने जाते | दु:ख लवकर संपत नाही. |
| 385 | फट म्हणताच ब्रम्ह | हत्या छोट्या गोष्टीवरुन दोषी ठरवणे |
| 386 | देवाची करणी अन नारळात पाणी | नैसर्गिक गोष्टींना तोड नसते |
| 387 | दही वाळत घालून भांडण | एखाद्या नुकसानाची तमा न बाळगता वैर करणे सुरूच ठेवणे |
| 388 | भरंवशाच्या म्हशीला टोणगा | पूर्ण निराशा करणे |
| 389 | द्या दान सुटे गिरान (ग्रहण) | एखादा आशावाद दाखवून द्रव्याची अपेक्षा करणे |
| 390 | बाळाचे बाप ब्रह्मचारी | निष्पाप वाटणाऱ्या व्यक्ती दोषी असणे |
| 391 | वाचाल तर वाचाल | शिक्षण घेतले की तरच प्रगती होऊ शकते |
| 392 | पायीची वहाण पायी बरी | योग्यतेप्रमाणे वागवावे |
| 393 | दाखवायचे दात वेगळे अन खायचे दात वेगळे | प्रकट करताना विचार वेगळे अन मनात काही वेगळेच विचार |
| 394 | वासरात लंगडी गाय शहाणी | मूर्ख लोकांमध्ये कमी बुध्धिवान मनुष्यसुद्धा प्रसिद्ध असतो |
| 395 | नकटे व्हावे पण धाकटे होऊ नये | छोट्या व्यक्तींना नेहमी कामे सांगितली जातात |
| 396 | ताकापुरते रामायण | एखादी गोष्ट मिळेपर्यंत संवाद साधणे. स्वार्थ साधल्यावर तडक निघून जाणे. |
| 397 | दे माय धरणी ठाय करणे | खूप त्रस्त होणे |
| 398 | ताकास तूर न लागू देणे | मनातील गोष्ट न सांगणे |
| 399 | पालथ्या घड्यावर पाणी | नि:बुध्ध व्यक्तीचे वर्तन सुधारत नाही |
| 400 | शेळी जाते जीवानिशी खाणारा म्हणतो वातड | आपल्या स्वार्थ साधण्यासाठी दुसऱ्याच्या जीवाचा विचार न करणे |
| 401 | ल्या गाड्यास सूप जड नाही | समर्थ व्यक्तीला छोटे काम विशेष वाटत नाही |
| 402 | सरड्याची धाव कुंपणा पर्यंतच | दुर्बळ माणूस एका मार्यादेच्याआतच काम करतो |
| 403 | दिल्या भाकरीचा सांगितल्या चाकरीचा | एखादा मनुष्य एकाच ठिकाणी फार काहीअपेक्षा न ठेवता काम करतो. |
| 404 | ताकास जाऊन लोटा लपवणे | एखादी गोष्ट इच्छा नसतांना लपविणे |
| 405 | शुद्ध नाही मन तया काय करी साबण | मनात कुविचार असता चांगले विचार ऐकणे व्यर्थ आहे |
| 406 | संन्याश्याच्या लग्नाला शेंडीपासून प्रारंभ | मुळात कमी तयारी असलेल्या व अडखळत असलेल्या कार्यात अनेक बाधा येणे |

| | | |
|---|---|---|
| **407** | नाकापेक्षा मोती जड | महत्वाची गोष्ट सोडून इतर गोष्टीला महत्त्व येणे |
| **408** | तोंडाला पाने पुसणे | हमी देऊन समोरच्या व्यक्तीचे काम न करणे |
| **409** | शेरास सव्वाशेर | प्रतिपक्षापेक्षा श्रेष्ठ |
| **410** | दिवसा चुल रात्री मूल | दिवस-रात्र कामाचा त्रास असणे. |
| **411** | साखरेचे खाणार त्याला देव देणार | सगळ्यांशी आपुलकीने वर्तन केल्यास असाध्य बाब साध्य होऊ शकते |
| **412** | संगत गुण से सोबत गुण | दोन व्यक्तींना सोबत राहताना एकमेकांच्या सवयी लागणे |
| **413** | दमडीची नाही मिळकत आणि घडीची नाही फुरसत | रिकामटेकडा मनुष्य आपण खूप व्यस्त आहे असे दर्शवितो. |
| **414** | मनी वसे ते स्वप्नी | आपण ज्या गोष्टीचा सदैव विचार करतो तीच गोष्ट आपल्याला आसपास दिसते (आभास होतो) |
| **415** | पेराल तसे उगवेल | कर्मानुसार तसे फळ मिळते |
| **416** | तेरड्याचा रंग तीन दिवस | एखादे कार्य थोडे दिवस जोरात चालून एकदम बंद पडणे |
| **417** | दाम करी काम | पैशाला किंमत असते |
| **418** | हत्ती होऊन ओंडके, मुंगी होऊन साखर खाल्लेली बरी | मोठेपणा न मिरवता छोटे होऊन आपले काम परिपूर्ण करणे सुखी आहे |
| **419** | बाबाही गेला दशम्या गेल्या | एकाच दोन वेगवेगळ्या गोष्टींवर लक्ष केंद्रित केल्यावर दोन्ही गोष्टींचा लाभ न होणे |
| **420** | सरकारी काम अन बारा महिने थांब | काही कामं नेहमी विलंबाने होत असतात, त्या साठी धीर देणे योग्य |
| **421** | नव्याची नवलाई | एखाद्या नवी गोष्टीचा उदोउदो करणे |
| **422** | प्रयत्नांती परमेश्वर | खूप कष्ट करण्याची तयारी असली की कोणतीही गोष्ट साध्य होऊ शकते |
| **423** | दानवाच्या घरी रावण देव | जसा आपला स्वभाव तसे आपले श्रद्धास्थान बदलते. |
| **424** | दगडावरची रेघ | कायमची गोष्ट |
| **425** | लहान तोंडी मोठा घास | छोट्या व्यक्तीने आवाक्या बाहेरच्या गोष्टी करणे |
| **426** | पहिले पाढे पंचावन्न | भरपूर समजावुन सुद्धा वाईट वागण्यात बदल न होणे |
| **427** | हातावर तुरी देणे | एखाद्याच्या कचाट्यातून सुटणे |
| **428** | हपापाचा माल गपापा | अती हव्यासाने असलेले द्रव्य ही नष्ट होते |
| **429** | शितावरून भाताची परीक्षा | फार थोड्या नमुन्यावरुन मोठ्या वस्तूंची चाचणी करणे |
| **430** | पुढच्यास ठेच मागचा शहाणा | एकाच मार्गावरील पुढील व्यक्तीस वाईट अनुभव आल्यास तो मागच्या माणसा साठी मार्गदर्शक ठरतो |
| **431** | देश तसा वेश | प्रदेशाप्रमाणे आपले संस्कार, पोशाख बदलतो. |
| **432** | दारात नाही आड म्हणे लावतो झाड | साधने नसताना एखादी गोष्ट हौस म्हणून करणे |
| **433** | नरोवा कुंजरोवा | कोणत्याही गोष्टीबाबत भाष्य न करणे, केल्यास संभ्रम निर्माण करणे |
| **434** | तळ्यात मळ्यात करणे | मनाची अवस्था अस्थिर असणे |
| **435** | लंकेची पार्वती असणे | अत्यंत गरीब असणे |
| **436** | पाण्यात राहून माशाशी वैर | बलवानाशी शत्रुत्व काय कामाचे? |
| **437** | बोलाचीच कढी बोलाचाच भात | कार्य न करता वायफळ बडबड करणे |

| | | |
|---|---|---|
| 438 | दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ दिसते पण स्वतःच्या डोळ्यातील मुसळ दिसत नाही | स्वतःच्या चुकांकडे दुर्लक्ष करून दुसऱ्याच्या चुकांविषयी बोलणे |
| 439 | नसून खोळंबा असून दाटी | एखाद्या प्रमुख व्यक्तीचा कोणताही उपयोग न होणे |
| 440 | लहानपण देगादेवा मुंगी साखरेचा रवा | मोठेपणा न मिरवता छोटे होऊन आपले काम परिपूर्ण करणे सुखी आहे |
| 441 | दिवाळी दसरा हात पाय पसरा | सण बघून भरमसाठ खर्च करणे |
| 442 | नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्न | असलेल्या व अडखळत मुळात कमी तयारीअसलेल्या कार्यात अनेक बाधा येणे |
| 443 | बाप दाखव नाही तर श्राद्ध कर | कोणत्याही गोष्टीचा पुरावा मागणे |
| 444 | दुष्काळात तेरावा महिना | संकटात अधिक भर पडणे |
| 445 | दहा गेले पाच उरले | आत्मविश्वास कमी होणे. |
| 446 | दोन्ही घरचा पाहुणा उपाशी | दोन वेगवेगळ्या समूहाना पाठिंबा देणाऱ्या व्यक्तीला तोटा होतो |
| 447 | दगडा पेक्षा वीट मऊ | छोट्या गोष्टीत समाधानी राहणे |
| 448 | भित्यापाठी ब्रह्म राक्षस | भित्रा माणूस सदैव कोणत्याही छोट्या बाबीना घाबरतो. |
| 449 | दक्षिणा तशी प्रदक्षिणा | व्यवसायात जसा लाभ असेल तसे महत्त्व आपल्या ग्राहकास देणे |
| 450 | मऊ सापडले म्हणून कोपराने खणू नये | एखाद्याच्या चांगुलपणाचा फार फायदा घेऊ नये |
| 451 | तेल गेले तूप गेले हाती आले धुपाटणे | एकाच दोन वेगवेगळ्या गोष्टींवर लक्ष केंद्रित केल्यावर दोन्ही गोष्टींचा लाभ न होणे |
| 452 | हत्ती गेला शेपूट राहिलं | अवघड काम संपल्यानंतर छोटे (सोपे) राहणे |
| 453 | तहान लागल्यावर विहीर खोदणे | गरज लागल्यानंतरच एखाद्या गोष्टीसाठी तयारी करणे |
| 454 | बुडत्याला काठीचा आधार | संकटग्रस्त मनुष्यास छोटी मदत सुद्धा मोठी वाटते |
| 455 | देणं न घेणं आणि कंदिल लावून येणं | उगाचच एखाधाची कुरापत काढणे. |
| 456 | दांत आहे तर चणे नाहीत, चणे आहेत तर दांत नाहीत | सर्व गोष्टी उपलब्ध असल्यातरी त्याचा उपभोग घेता न येणे. |
| 457 | दिवस गेला रेटारेटी, चांदण्यात कापूस वेचीत | दिवसभर आपला वेळ वाया घालवून शेवटच्या क्षणास धावा-धाव करणे. |
| 458 | हा सूर्य आणि हा जयद्रथ | पुराव्यासहित सिद्ध करणे |
| 459 | नाक दाबले की तोंड उघडते | मनस्थितीत हवे ते काम एखाद्यास कोंडीत पकडून ऋण घेता येते |
| 460 | वारा पाहून पाठ फिरवावी | वातावरण पाहून वागावे |
| 461 | मूर्ती लहान पण कीर्ती महान | छोटा मनुष्य तरी कार्यक्षमता खूप असणे |
| 462 | लेकी बोले सुने लागे | एकाला बोलल्यावर दुसऱ्याने त्यातील संदेश ओळखणे |
| 463 | दात कोरुन पोट भारता येत नाही | इकडून तिकडून आणलेल्या अल्प मिळकतीवर जीवन व्यतीत करता येत नाही |
| 464 | तुझी दाढी जळू दे पण माझी वीडी पेटू दे | दुसऱ्याचे नुकसान झाले तरी चालेल पण स्वतःचा स्वार्थ साधणे |
| 465 | नवी विटी नवे राज्य | नवीन राज्यकर्ते नवीन कायदे आणतात |
| 466 | दोन डोळे शेजारी, भेट नाही संसारी | जिवलग दोन व्यक्तींची भेट जवळ असूनही न होणे. |
| 467 | दहा मरावे पर दहांचा पोशिंदा मरु नये | महत्त्वाची व्यक्ती गेली तर फार मोठे नुकसान होते. |

| | | |
|---|---|---|
| **468** | शेंडी तुटो की पारंबी तुटो | एखाद्या गोष्टीचे परिणाम काय राहणार याची चिंता न करणे |
| **469** | नाव सोनुबाई अन हाती कथलाचा वाळा | नावाप्रमाणे महती नसणे |
| **470** | दुध पोळलं की ताक फुंकून प्यावे | एखादा अवघड प्रसंग सोसल्यावर पुढे काळजी घेणे |
| **471** | हातच्या कंकणाला आरसा कशाला | उघड सत्य हे केव्हाही खरे करता येऊ शकते |
| **472** | विंचवाचे बिहाड पाठीवर | फिरत्या माणसाचा ठाव ठिकाणा लागणे मुश्कील असते किंवा अस्थिर गोष्टी या कायम मूळ विषयापासून भटकतात |
| **473** | वराती मागून घोडे | एखादी गोष्टीचे महत्व संपल्या नंतर त्यासाठी उपाय योजना करणे व्यर्थ आहे |
| **474** | वाऱ्यावरती वरात काढणे | स्वतः नियोजन न करता दुसऱ्यावर विसंबून महत्त्वाचे कार्य करणे |
| **475** | नावडतीचे मीठ अळणी | नावडत्या व्यक्तीने केलेली कोणतीही गोष्ट आवडत नाही |
| **476** | बोलाचीच कढी बोलाचाच भात | खोटी आश्वासने देणे |
| **477** | शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी | संस्कारी कुटुंबात चांगल्या व्यक्ती असतात |
| **478** | दुधात साखर पडणे | एकाचवेळी अनेक गोष्टीचा लाभ होणे |
| **479** | तीन तिघाडा काम बिघाडा | एखादे काम भरपूर जणांनी लक्ष केंद्रित करून केले तर अपयश येऊ शकते |
| **480** | तरण्याला लागली कळ अन म्हातारयाला आल बळ | तरुण माणूस आळशी असतो |
| **481** | नाव सगुणी अन करणी अवगुणी | नावाप्रमाणे न राहता वाईट कृत्य करणे |
| **482** | निंदकाचे घर असावे शेजारी | आपल्या टीकाकारांमुळे आपला विकास होतो |
| **483** | तोबरयाला पुढे ,लगमला मागे | फायद्याचा वेळी पुढे पुढे ,कामाच्या वेळी मात्र मागेमागे |
| **484** | बैल गेला नि झोपा केला | एखाद्या गोष्टीची निकड संपल्यावर त्या गोष्टीसाठी काम करणे |
| **485** | दिवस बुडाला मजूर उडाला | टाम-टून काम करून निघून जाणे. |
| **486** | दैव देते कर्म नेते | कर्म वाईट केले तर चांगल्या गोष्टीचा त्याग करावा लागतो |
| **487** | राजा उदार झाला हाती भोपळा दिला | आशा असताना एखाद्या मोठ्या व्यक्तीने अपेक्षेनुसार काम न करणे |
| **488** | नर का नारायण बनणे | कर्म करून उच्च होणे |
| **489** | दुःख रेड्याला न डाग पखालीला | एखाद्याच्या त्रासामुळे दुसरा चांगला व्यक्ती त्रासात पडणे. |
| **490** | शेरास सव्वाशेर | प्रत्येक वाईट माणसाला त्यापेक्षा वरचढ माणूस मिळतोच |
| **491** | थेंबे थेंबे तळे साचे | काटकसर केल्यास बरीच शिल्लक मागे पडते |
| **492** | दिसतं तस नसतं म्हणून जग फसतं | दिखाऊ गोष्टी या कायम तकलादू असतात, मुळात वेगळेच काही असते. |
| **493** | दुधापेक्षा सायीवर प्रेम जास्त | मुलांपेक्षा नातवंडांवर अधिक प्रेम असणे. |
| **494** | सुंभ जळतो पण पिळ जळत नाही | भरपूर शिक्षा होऊन सुध्दा वाईट प्रवृत्ती नष्ट करता येत नाही |
| **495** | दुष्टी आड सृष्टी | आपल्या पाहण्यापलीकडे पण जग आहे |
| **496** | राम कृष्ण आले गेले तरीही जग का चालायचे थांबले | व्यावहारिक बाबी कुणासाठीही थांबत नाही |
| **497** | नाव मोठे लक्षण खोटे | #श्रीमंत असून कंजूष असणे, #श्रीमंत असण्याचा आव आणणे |
| **498** | दांत कोरून पोट भरतो | उपजिवीकेसाठी फार थोडे श्रम घेऊन जीवन व्यतीत करणे. |

| | | |
|---|---|---|
| 499 | दुर्दैवाचे दशावतार होणे | अनेक बाजूने संकट येणे |
| 500 | नव्याचे नऊ दिवस | नवेपणा असतानाचे कौतुक नंतर टिकत नाही |
| 501 | कोळसा उगाळावा तितका काळांच | वाईट गोष्ट कितीही तपासली तरीही त्यांतून वाईटच निघणार. |
| 502 | गर्जेल तो पडेल काय ? | केवळ बडबड करणाऱ्या माणसाकडून काहीच होत नाही. |
| 503 | ऐकावे जनाचे करावे मनाचे | अनेकांचा सल्ला घ्यावा पण स्वतःला पटेल तेच करावे. |
| 504 | खाण तशी माती | आईवडीलांप्रमाणे त्यांच्या मुलांची वर्तणूक ह्असते. |
| 505 | कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ | आपल्याच जातीतला फितुरीमुळे आपला घात करतो. |
| 506 | टाकीचघाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही | कष्ट सोसल्याशिवाय मोठेपणा प्राप्त होत नाही. |
| 507 | पालथ्या घागरीवर पाणी | केलेला उपदेश वाया जाणे. |
| 508 | तळे राखी तो पाणी चाखी | स्वाधीन केलेल्या गोष्टींचा तो थोडा तरी फायदा घेतोच. |
| 509 | नाकापेक्षा मोती जड | मालकापेक्षा नोकर शिरजोर, कुवतीपेक्षा अवघड कामगिरी स्वीकारणे. |
| 510 | गोगल गाय अन् पोटात पाय | एखाद्याचे खरे स्वरूप न दिसणे. |
| 511 | गाढवाला गुळाची चव काय ? | मूर्खाला चांगल्या गोष्टीची किंमत कळत नाही. |
| 512 | नाव सोनुबाई हाती कथलाचा वाळा | नाव मोठे पण कर्तृत्व कमी प्रतीचे. |
| 513 | आंधळे दळते नि कुत्रे पिठं खाते | एकाने मेहनत करायची व दुसऱ्याने त्याचा फायदा घ्यायचा. |
| 514 | अति शहाणा त्याचा बैल रिकामा | अति शहाणपण नुकसानकारक ठरते. |
| 515 | दोघांचे भांडण तिसऱ्याचां लाभ | दोघांच्या वादात तिसऱ्या व्यक्तीचा फायदा होतो. |
| 516 | ज्याचे करावे बरे तो म्हणतो आपलेच खरे | एखाद्याचे भले करायला जावेतर तोत्या गोष्टीस हेकेखोरपणे विरोध करतो. |
| 517 | अति तेथे माती | कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईट असतो. |
| 518 | आयत्या बिळावर नागोबा | दुसऱ्याच्या श्रमाचा फायदा स्वतःसाठी करून घेणे. |
| 519 | दैव देते आणि कर्म नेते | सुदैवाने,लाभलेली वस्लू नियतीने गमावून बसणे. |
| 520 | इकडे आड तिकडे विहिर | दोन्ही बाजूंनी अडचणीत सापडणे |
| 521 | कामापुरता मामा | काम साधण्यासाठी गोड बोलणारी व्यक्ती. |
| 522 | आपला हात जगन्नाथ | आपल्याला घेण्याची संधी मिळताच मुबलक घेणे. |
| 523 | दगडापेक्षा वीट मऊ | मोठ्या संकटापेक्षा लहान संकट सुसह्य वाटते. |
| 524 | घरोघरी मातीच्या चुली | सर्वत्र सारखीच परिस्थिती. |
| 525 | एका हाताने टाळी वाजत नाही | भांडणातील दोष एकाच पक्षाकडे असतं नाही. |
| 526 | कोल्हा कांकडीला राजी | क्षुद्र माणसे क्षुल्लक गोष्टीने संतुष्ट होतात. |
| 527 | देखल्या देवा दंडक्त | एखादी व्यक्ती सहजगत्या भेटली म्हणून केवळ तिची विचारपूस करणे. |
| 528 | करावे तसे भरावे | वाईट कृत्य करणाऱ्यास त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात. |
| 529 | पी हळद अनू हो गोरी | एखाद्या कृत्याचा त्वरीत लाभ मिळावा अशी अपेक्षा करणे. |
| 530 | नाव मोठे लक्षण खोटे | भपका मोठा पण वस्तुस्थिती नेमकी उलटी. |
| 531 | नाचता येईना अंगण वाकडे | उणिवा झाकण्यासाठी दुसऱ्या वस्तूला नावे ठेवणे. |

| | | |
|---|---|---|
| 532 | दोन्ही घरचा पाहुणा उपाशी | दोन्ही गोष्टींवर अवलंबून असणाऱ्याला कोणतीच गोष्ट मिळत नाही. |
| 533 | कावळ्याच्या शापाने गाय मरत नाही | क्षुद्र माणसांच्या निंदेने. थोरांचे नुकसान होत नाही. |
| 534 | उथळ पाण्याला खळखळाट फार | अंगी गुण श्रोडे असणारा बढाई मारतो. |
| 535 | उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग | उतावळपणानेमूर्खासारखे वर्तन करणे. |
| 536 | जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही | मुळचा स्वभाव आयुष्यात कधीच बदलत नाही. |
| 537 | असतील शिते तर जमतील भुते | आपल्याजवळ पैसे असे तोवर मित्रांची वाण नसते. |
| 538 | गर्वाचे घर खाली | घमेंडखोर माणसावर नाचक्कीची वेळ येते. |
| 539 | गाढवापुढे वाचली गीता कालचा गोंधळ बरा होता | मूर्खाला केलेला उपदेश निष्फळ ठरतो. |
| 540 | दे माय धरणीं ठाय | पुरे पुरेसे होणे. |
| 541 | दिव्याखाली अंधार | मोठ्या माणसांत देखील दोष असतात. |
| 542 | घर फिरले म्हणजे घराचे वासेही फिरतात | प्रतिकूल परिस्थितीत सारेच उलट वागू लागतात. |
| 543 | नावडतीचे मीठ अळणी | नावडत्या व्यक्तीने केलेली चांगली गोष्ण्ी वाईट वाटते. |
| 544 | आधी पोटोबा मग विठोबा | प्रथम पोटाची सोय पहावी; नंतर देवधर्म करावा. |
| 545 | कानामागून आली आणि तिखट झाली | श्रेष्ठापेक्षा कनिष्ठ मार्णसाने वरचढ ठरणे. |
| 546 | तेल गेले, तुप गेले, हाती धुपाटणे आले | फायद्याच्या दोन्ही गोष्टी मूर्खपणामुळे हातच्या जाऊन क्षुल्लकगोष्टयेणे. |
| 547 | दाम करी काम | पैशाने सर्व कामे साध्य होतात. |
| 548 | नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्ने | दोषयुक्त कामात अनेक अडचणी येतात. |
| 549 | ज्याच्या हाती ससा तो पारधी | ज्याला यश आले तो कर्तबगार. |
| 550 | चार दिवस सासूचे चार दिवसं सुनेचे | प्रत्येकाला अधिकार गाजविण्याची आयुष्यात संधी मिळतेच. |
| 551 | खोट्याच्या कपाळी गोटा | वाईट काम करणाऱ्याचेच नुकसान होते. |
| 552 | गुरूची विद्या गुरुला फळली | एखादयाचा डाव त्याच्यारच उलटणे. |
| 553 | नवी विटी नवे राज्य | सगळीच परिस्थिती नवीन असणे. |
| 554 | काखेत कळसा आणि गावाला वळसा | हरवलेली वस्तू जवळ असताना सर्वत्र शोधत राहणे. |
| 555 | गरज सरो वैद्य मरो | गरज संपल्यावर उपकारकर्त्याला विसरणे. |
| 556 | अंगापेक्षा बोंगा मोठा | खऱ्या गोष्टीपेक्षा त्याचे अवडंबरच मोठे. |
| 557 | आंधळा मागतो एक डोळा देव देतो दोन डोळे | अपेक्षेपेक्षा किती तरी अधिक फायदा होणे. |
| 558 | पुढच्यास ठेच मागचा शहाणा | दुसऱ्याच्या अनुभवातून आपण धडा घेणे. |
| 559 | ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी | एकमेकांची वर्मे ठाऊक असणाऱ्या माणसांशी गाठ पडणे. |
| 560 | दुष्काळात तेरावा महिना | अगोदरच्या संकटात आणखी भर. |
| 561 | तेरड्याचा रंग तीन दिवस | एखाद्या गोष्टीचे नावीन्य अल्पकाळच टिकते. |
| 562 | गाढवांचा गोंधळ, लाथांचा सुकाळ | मूर्ख लोक एकत्र आल्यास मूर्खपणाचीच कृत्यं करणार. |
| 563 | काप गेले नि भोके रांहिली | वैभव जाऊन त्याच्या फक्त खुणा राहिल्या. |

| | | |
|---|---|---|
| **564** | आडात नाही तर पोहऱ्यात कोठून येणार ? | स्वतःजवळ नाहीतर तो दुसऱ्यास काय देणार ? |
| **565** | देश तसा वेश | परिस्थितीनुसार वागणे विल्या . |
| **566** | अडला नारायण गाढवाचे पाय धरी | थोर माणसांनाही प्रसंगी मूर्खांची मनधरणी करावी लागते. |
| **567** | घरचे झाले थोडे, व्याहयाने धाडले घोडे | स्वतःच्या कामाचा व्याप असताना दुसऱ्याने आपलेही काम लादणे. |
| **568** | आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास | एखादी गोष्ट करायला अनुत्सुक माणसाला न करायला नेमके कारण सापडते. |
| **569** | दुभत्या गाईच्या लाथा गोड | ज्याच्यापासून लाभ होतो त्यांचा त्रासही माणूस सहन करतो. |
| **570** | एका किंवा एकाच माळेचे मणी | सगळीच माणसे सारख्या स्वभावाची. |
| **571** | उचलली जीभ लावली टाळ्याला | अव्चाराने वागणे . |
| **572** | उंदराला मांजर साक्ष | वाईट कृत्य करत असताना एकमेकांना साक्ष देणे. |
| **573** | झाकली भूठ सव्वा लाखाची | व्यंग गुप्त ठेवणेच फायदेशीर असते , मौन पाळून अब्रू राखणे. |
| **574** | जळात राहून माशाशी वैर | सहवासात रहायच्या व्यक्तीशी वैर करू नये. |
| **575** | चोराच्या हातची लंगोटी | लबाड कंजूषाकडूंन थोडे मिळाले तरी भाग्याचे. |
| **576** | कसायाला गाय धार्जिणी | दुष्ट व कठोर माणसांशी सर्व लोक नम्रतेने वागतात. |
| **577** | देव तारी त्याला कोण मारी | देवं पाठिराखा असलेल्याचे कोणीही नुकसान करू शकणार नाही. |
| **578** | दृष्टी आड सृष्टी | आपल्यामागे जे काय चालते त्याकडे दुर्लक्ष करणे. |
| **579** | नव्याचे नऊ दिवस | नवीन गोष्टीचे काही दिवस कौतुक होते. |
| **580** | कर नाही त्याला*डर कशाला ? | निरपराधी माणूस निर्भय असतो. |
| **581** | खाईन तर तुपाशी नाहीतर उपाशी | परिस्थितीशी जुळवून न घेता स्वतःच्या हट्टी मताप्रमाणे वागणारा. |
| **582** | डोळ्यात केर आणि कानात फुंकर | रोग एका जागी पण इलाज दुसरीकडे कंरणे. |
| **583** | चोराच्या उलट्या बोंबा | स्वतःच गुन्हा करून दुसऱ्याला दोष देणे. |
| **584** | असंगासी संग आणि प्राणाशी गाठ | दुर्जन माणसाशी संगत केल्यास प्रसंगी जीवालाही धोका निर्माण होतो. |
| **585** | दुरून डोंगर साजरे | दुरून चांगल्या दिसणाऱ्या गोष्टींचे खरे स्वरुप जवळून समजते. |
| **586** | एक ना धड भाराभर चिंध्या | एकाच वेळी अनेक गोष्ठी केल्याने सर्वच गोष्टी अर्धवट राहतात. |
| **587** | ताकापुरते रामायण | एखाद्याकडून आपले काम होईपर्यंत त्याची खुशामत करणे. |
| **588** | पळसाला पाने तीनच | कोठेही गेले तरी मनुष्य स्वभाव सारखाच. |
| **589** | पदरी पडले पवित्र झाले | स्वीकारलेल्या बाबीला नावे न ठेवता समाधान मानणे. |
| **590** | नाक दाबले की तोंड उघडते | अडवणूक करून काम साधणे. |
| **591** | ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी | उपकारकर्त्यांचे उपकार स्मरून. त्याची बाजू घेणे. |
| **592** | गाड्याबरोबर नळ्याची यात्रा | मोठ्यांच्या आश्रयाने लहानांचाही फायदा होतो. |
| **593** | न कर्त्याचा वार शनिवार | न करायंचे काम सबबी सांगून टाळणे. |
| **594** | खायला काळ भुईला भार | निरूद्योगी मनुष्य सर्वांना भारभूत होतो. |
| **595** | पुराणातील वांगी पुराणात | उपदेशाप्रमाणे वर्तन नसणे. |
| **596** | चोर सोडून संन्याशाला सुळी देणे | खऱ्या अपराध्याला सोडून निरपराधी माणसाला शिक्षा देणे. |

| | | |
|---|---|---|
| **597** | खाई त्याला खवखवे | वाईट काम करणाऱ्याच्या मनात भीती असते. |
| **598** | पाचामुखी परमेश्वर | पुष्कळ लोक बोलतात ते खरे मानावे. |
| **599** | थेंबे थेंबे तळे साचे | थोड्या थोड्या बचतीचा कालांतराने मोठा संचय होतो. |
| **600** | चोराच्या मनात चांदुणे | वाईट काम करणाऱ्याच्या मनात भीती असते. |
| **601** | अंथरूण पाहून पाय पसरावे | आपल्या ऐपतीप्रमाणे खर्च ठेवावा. |
| **602** | रात्र थोडी सोंगे फार | कामे पुष्कळ त्यामानाने वेळ थोडा. |
| **603** | यथा राजा तथा प्रजा | प्रमुख व्यक्तीच्या वर्तणुकीचा त्याच्या हाताखालच्या व्यक्तीवर प्रभाव पडतो. |
| **604** | बळी तो कान पिळी | शक्तीमान मनुष्य दुसऱ्यावर अधिकार गाजवतो. |
| **605** | मनी वसे ते स्वप्नी दिसे | जसा विचार तशी स्वप्ने पडणे. |
| **606** | साखरेचे खाणार त्याला देव देणार | सुदैवी माणसाला कशाचीही उणीव पडत नाही. |
| **607** | रोज मरे त्याला कोण रडे | वारंवार घडणाऱ्या गोष्टीविषयी स्वारस्य उरत नाही. |
| **608** | लहान तोंडी मोठा घास | आपली योग्यता नसताना मोठ्यांस सल्ला देणे. |
| **609** | शेंडी तुटो की पारंबी तुटो | पक्का निश्चय करणे. |
| **610** | बडा घर पोकळ वासा | दिसायला श्रीमंती परंतु प्रत्यक्षात तिचा अभाव. |
| **611** | भुकेला कोंडा निजेला धोंडा | अतिशय गरज असली म्हणजे काहीही चालते. |
| **612** | सगळे मुसळ केरात | मुख्य बाबीकडे दुर्लक्ष केल्यास सर्व श्रम वाया जाणे. |
| **613** | बाप तसा बेटा | बापाचे गुणावगुण मुलाच्या अंगी असणे. |
| **614** | वासरांत लंगडी गाय शहाणी | मूर्ख माणसांत थोडेसे ज्ञान असलेला शहाणा ठरतो. |
| **615** | भरवशाच्या म्हशीला टोणगा | ज्याच्या विषयी अपेक्षा आहेत अशा व्यक्तीने संपूर्ण निराशा करणे. |
| **616** | सुंठीवाचून खोकला जाणे | उपचाराशिवाय दोष निवारण होणे. |
| **617** | भीक नको, पण कुत्रं आवरं | एखादयाने कार्यास मदत केली नाही तरी चालेल पण त्या कार्यात विघ्न न आणू नयेत अशी स्थिती. |
| **618** | बुडत्याचा पाय खोलात | अधोगती होऊ लागली की अनेक बाजूंनी होते. |
| **619** | पेरावे तसे उगवते | चांगल्या किंवा वाईट कृत्याप्रमाणे त्याचे तसे फळ मिळते. |
| **620** | लेकी बोले सुने लागे | एखादयाला उद्देशून पण दुसऱ्याला लागेल असे बोलणे. |
| **621** | मुलाचे पाय पाळण्यात दिसतात | भविष्यात कोण होणार याचा अंदाज बालपणी |
| **622** | वड्याचे तेल वांग्यावर | एकाबद्दल दुसऱ्यास दोष देणे. |
| **623** | सुंभ जळाला तरी पीळ जात नाही | हट्टापायी नुकसान झाले तरी त्याचा हट्टीपणा जात नाही. |
| **624** | हातचे सोडून पळत्याच्या पाठी लागणे | सहज साध्य सोडून अशक्य गोष्टीच्या मागे लागणे. |
| **625** | हलवायाच्या घरावर तुळशीपत्र | आपली नसलेल्या वस्तूचे दान करणे, परस्पर दुसऱ्याची वस्तू तिसऱ्याला देणे. |
| **626** | हाजीर तो वजीर | वेळेवर हजर राहणाऱ्याला लाभ होतो. |
| **627** | मऊ सापडले म्हणून कोपराने खणू नये | कोणाच्या चांगुलपणाचा गैरफायदा घेऊ नये. |
| **628** | शेरास सव्वाशेर | सामर्थ्यवान माणसाला गर्व उतरवणारा अधिक बलवान माणूस भेटतो. |
| **629** | भित्या पाठी ब्रह्मराक्षस | भित्र्या माणसावरच संकटे कोसळतात. |

| | | |
|---|---|---|
| **630** | बुडत्याला कडीचा आधार | संकटात थोडीशी मदत देखील महत्वाची वाटते. |
| **631** | हत्ती गेला शेपूट राहिले | बहुतेक काम पूर्ण होऊन थोडेसे शिल्लक राहणे. |
| **632** | मांजरांच्या गळ्यात घंटा कोणी बांधावी ? | जोखमीचे काम करण्यास कोणी पुढे सरसावत नाही. |
| **633** | हातच्या काकणाला आरसा कशाला | प्रत्यक्ष दिसणाऱ्या गोष्टीला पुराव्याची गरज नसते. |
| **634** | सरड्याची धाव कुंपणापर्यंत | प्रत्येक गोष्टीची मर्यादा ठरलेली असते. |
| **635** | शितावरून भाताची परीक्षा | वस्तूच्या लहानशा भागावरून संपूर्ण वस्तूची परीक्षा करणे. |
| **636** | प्रयत्नांती परमेश्वर | प्रयत्नांती असाध्य गोष्ट साध्य करता येते. |
| **637** | शहाण्याला शब्दांचा मार | सूज्ञ माणूस सूचना देऊनही सुधारतो. |
| **638** | बैल गेला नि झोपा केला | हानी झाल्यावर संरक्षणाची तयारी व्यर्थ. |
| **639** | वराती मागून घोडे | काम पूर्ण झाल्यावर मदतीस येणे, एखादी गेष्ट घडून गेल्यावर मदतीस येणे. |
| **640** | मनात मांडे पदरात धोंडे | केवळ दिवास्वप्न पाहून प्रत्यक्षात काही मिळत नाही. |